3

**दिनांक ११/०१/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठकीचे इतिवृत्त**

दिनांक ११/०१/२०२३ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांची यादी सोबत जोडली आहे. सभेत पुढील प्रमाणे कार्यवाही झाली.

सभेच्या सुरुवातीस श्री के.जी. तांदळे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली. **तसेच जिल्हा निर्यात प्रचालन समिती बाबत माहिती सभागृहास दिली. जिल्ह्याच्या निर्यात आराखड्याचे सविस्तर वाचन करण्यात आले.** बीड जिल्ह्यात असलेल्या सर्व महत्वाचे उद्योग, साखर कारखाने, कल्स्टर, औद्योगीक संघटना या बाबतची माहिती सभागृहास देण्यात आली. पैकी दोन क्लस्टर प्रत्यक्षात कार्यरत असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सांगितले. तसेच बीड जिल्ह्याच्या भौगोलीक परिस्थती, दळणवळणाच्या सुविधा व कृषीबाबतची सविस्तर माहिती सभागृहास देण्यात आली.

निर्यातीमध्ये भारताचे स्थान अबाधीत राखण्यासाठी व एक ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष साकारण्याच्या दृष्टीने राज्याची निर्यात क्षमता वाढविणे हाच प्रमुख हेतु आहे. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा २२ टक्के वाटा असुन बीड जिल्ह्याचा महाराष्ट्रा अंतर्गत ०.११ टक्के इतका वाटा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने केन शुगर, इंडियन कॉटन, रिफाईन्ड शुगर केन मोलेसेस, कॉटन यार्न, ऑईल केक व कांदा या उत्पादनांचा समावेश असल्याचे सुतोवाच केले.

बीड जिल्हयातुन ओडीओपीसाठी कस्टर्ड ॲपल (कृषी) तसेच कॉटन सीड व कॉटन सिड ऑईल (औद्योगिक) ही दोन उत्पादने निश्चीत करण्यात आलेली आहे. बीड जिल्ह्यामध्ये Custard Apple (Agri) चे प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे तसेच Cotton Bales & Cotton Seed Oil (Industries) चे जिल्ह्यात कापसाचे मोठ्या पमाणात उत्पादन होत असल्याने ODOP अंतर्गत या दोन घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. मा. अध्यक्ष यांनी जिल्हयातुन निर्यातीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याबाबत सुचना दिल्या.

नंत्तर सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांनी निर्यात करण्यासाठी खालील प्रमाणे अडचणी येतात त्या विषद करुन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

१. आवश्यक वाहतुकीच्या सुविधा नाहीत.
२. दळणवळणाच्या साधनांची कमतरता, जालना जिल्ह्यासारखी बीड जिल्ह्यासाठी रेल्वेची सुविधा उपलब्द व्हावी.
३. आधुनिक प्रयोग शाळा बीड जिल्हयात नसल्यामुळे ब-याच अडचणी निर्माण होतात.
४. बँके मार्फत लेटर ऑफ क्रेडिटसाठी प्रतिसाद मिळत नाही.
५. सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत अतिरिक्त / विशेष प्रात्साहने मिळावीत.

शेवटी सदर सभेस उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी व इतर सदस्यांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्यांचे घोषित करण्यात आले.

महाव्यवस्थापक तथा सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, बीड

13.1.23
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, बीड

जिल्हाधिकारी कार्यालय,बीड
ई-संचिका आवक क्रमांक 2023 - 12831
दिनांक :- 13/01/2023

**दिनांक ११/०१/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठकीस उपस्थित अधिकारी / उद्योजकांची यादी**

| अ.क्रं. | अधिकारी / उद्योजकांचे नाव | पदनाम व कार्यालय |
|---|---|---|
| १ | मा. श्री. राधाविनोद अ. शर्मा | जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय बीड |
| २. | श्री. बिजेंदु झा. | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, एसबीआय बीड |
| ३ | श्री. के. जी. तांदळे | महाव्यवस्थापक, जिउकें बीड |
| ४ | श्री. नरेंद्रकुमार कोकरे | एल. ए‍ी. ओ., आरबीआय मुंबई |
| ५ | श्री. इंगोले टी. बी. | एम. आय. डी. सी. बीड |
| ६ | श्री. टी. एल. मारकड | डी. डी. एम. नाबार्ड |
| ७ | श्री. ए. पी. शेळके | वस्तु व सेवाकर कार्यालय बीड |
| ८ | सौ. डॉ. कल्याणी झाडपिके | क्षेत्रअधिकारी, म. प्र. नि.मं. उपप्रादेशिक कार्यालय बीड |
| ९ | श्री. एस. आर. खरात | जि. ग्रा.अधिकारी, खादीग्रमोद्योग मंडळ बीड |
| १० | श्री. एस. बी. चिंचोलीकर | जि. स. अ. माविम बीड |
| ११ | श्री. राहुल कानडे | युको बँक बीड |
| १२ | श्री. वायाळ दिपक | कॅनरा बँक बीड |
| १३ | श्री. के. एस. पवार | उद्योग निरीक्षक जिउकें बीड |

**महाव्यवस्थापक,**
**जिल्हा उद्योग केंद्र, बीड**